**नि.फौ.ख.क्र.१४/२०२२**
**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १**
**निशाणी क्र.४०**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – यशवंत कृष्णा महामुलकर

**वय** – ७२ वर्षे, **धंदा** – शेती

**राहणार** – महामुलकरवाडी, ता.जावली, जि.सातारा

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.जे.आर.इंगळे यांचेमार्फत सुरु</u>**

१. दि.२१.०३.२०२२ रोजी पोलीसांनी मला रुपाली महामुलकर यांच्या दारासमोर चिंचेच्या झाडाखाली बोलावले होते. त्यादिवशी माझ्यासोबत दुसरे पंच शहाजी विठोबा महामुलकर हेदेखील होते. आशा अनिल साळेकर व अनिल दगडू साळेकर हे त्याठिकाणी हजर होते. अनिल साळेकर यांनी हवालदार यांना घटनास्थळ दाखवले. पोलीसांनी कसे मारले विचारले असता तेव्हा आशा अनिल साळेकर यांनी काठीने मारले असे सांगितले व अनिल साळेकरला जालींदर साळेकर चावले होते असे सांगितले होते. पोलीसांनी तेथे घटनास्थळ पाहून सर्व माहिती लिहिली. घटनास्थळावर सुबाभळीची काठी होती. सदर काठी ही २.५ फुट लांब होती. त्या काठीची १ बाजू फाकळलेली होती. पोलीसांनी ती काठी कागदात बांधून ठेवली व घेवून गेले. त्याचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा हा तोच आहे. त्यावर अ.क्र.१ वर माझी सही आहे. सदरील पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरील **घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यास निशाणी क्र.४१** देण्यात येत आहे. घटनास्थळ पंचनामा करताना फोटो काढले होते. आता मला दाखवण्यात आलेले एकुण ४ फोटो हे तेच आहेत. त्या फोटोमध्ये मी, पंच, आशा अनिल साळेकर व पोलीस आहेत. चौथा फोटो हा रुपाली महामुलकर यांच्या दरवाजाचा आहे. त्या दरवाजावरुन भांडणे झाली होती म्हणून त्याचा फोटो काढला होता. सदरील **फोटोंना एकत्रितपणे आर्टिकल अ** देण्यात येत आहे. पंचनामा १ तास चालू होता. सदरचा पंचनामा ०४:३० वाजता सुरु झाला व ०५:३० वाजता संपला. *(आता मला सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल एम.आर.नं.१/२०२३ व पोलीस स्टेशनचा एम.आर.नं.१९/२०२२*

*माझ्यासमक्ष, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेसमक्ष, आरोपी व आरोपीचे वकील यांचेसमक्ष उघडुन दाखवण्यात आला.)* आता मला दाखवण्यात आलेली काठी ही तीच आहे जी पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळावरुन जप्त केली होती. सदरील **काठीस आर्टिकल ब** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ कु.ए.के.शेटे यांचेमार्फत उलटतपास सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की, आमचे गाव हे ५०० ते ६०० लोकवस्तीचे गाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर थोडी घरे आहेत. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी पत्र दिले नाही. पोलीसांनी मला तोंडी सांगितले होते. मी घटना घडण्यापूर्वी घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, जी घटना घडली त्याबद्दल मला वैयक्तिक काही माहिती नव्हते. घटनास्थळाच्या पूर्वेला रस्ता, पश्चिमेला रुपाली महामुलकर यांचे घर, दक्षिणेस परडे आहे व उत्तरेला कंपाऊंड व परडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यासमक्ष फिर्यादीने घटनास्थळ मला दाखवलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आशा साळेकर व अनिल साळेकर यांना ओळखतो व त्यांचे व आमचे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेल्या काठया सहज उपलब्ध होतात. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा माझ्यासमक्ष केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांची पंचनामा पोलीस स्टेशनला केला व तेथेच माझ्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व माझे चांगले संबंध असल्यामुळे मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला सर्व मजकूर खोटा सांगितलेला आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

ठिकाण : मेढा

आर.बी.खवले,

दि.०९.०३.२०२३

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**